# सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद उस्मानाबाद

## विधिज्ञ पॅनल सन २०२३-२०२४

मा.सर्वाच्च न्यायालय,.दिल्ली मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद /मा.प्रशासकीय न्यायधिकरण,औरंगाबाद (MAT)/मा.अप्पर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे न्यायालय /मा.कामगार न्यायालय लातुर, जिल्हा न्यायालय उस्मानाबाद व उस्मानाबाद जिल्हयातील सर्व तालुका न्यायालय येथे जिल्हा परिषद,उस्मानाबाद च्या वतीने बाजु मांडण्यासाठी विधिज्ञ पॅनल दिनांक.०१/०९/२०२३ ते ३१/०७/२०२४ या कालावधीकरीता विधिज्ञ पॅनल गठीत करावयाचा आहे. करीता सोबतच्या नमुना अर्जामध्ये पात्र विधिज्ञांनी दिनांक. 31/०७/२०२३ पुर्वी अर्ज मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांचे कडे सादर करावा.

### सेवेच्या अटी व शर्ती

०१. विधिज्ञांची नियुक्ती ०१ सप्टेंबर २०२३ ते ३१ जुलै-२०२४ या कालावधीसाठी राहील.

०२. वरील कालावधीसाठी निवड झालेल्या विधिज्ञांना सबंधित न्यायालयामध्ये या जिल्हा परिषदेच्या वतीने न्यायालयीन प्रकरणात बाजु मांडणे आणि सल्ला/ अभिप्राय देणे बंधनकारक राहील.

०३. प्रत्येक विधिज्ञांस प्रकरणनिहाय नोंदवही ठेवावी लागेल व त्या प्रकरणाच्या प्रगती व निकालाची माहिती दर तीन महिन्यांनी सादर करावी लागेल प्रत्येक त्रैमासिक कालावधी संपल्यानंतर १० दिवसामध्ये ज्या विधिज्ञांकडुन प्रलंबीत व निकाली प्रकरणांचा अहवाल प्राप्त होणार नाही अशा विधीज्ञांना पुढे प्रकरणे देणे बंद करण्यात येईल.

०४. सोपविण्यात आलेल्या प्रत्येक न्यायालयीन प्रकरणात प्रत्येक तारखेस उपस्थित राहुन प्रकरणे चालवावी लागतील. कोणत्याही प्रकरणात एकतर्फी निकाल लागणार नाही किंवा अपीलाची मुदत टळणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

०५. प्रत्येक प्रकरणासाठी मा.सर्वाच्च न्यायालयासाठी कमाल फीस १७०००/- (अक्षरी-सतरा हजार रु.मात्र) व कार्यालयीन खर्च म्हणुन ३०००/- (अक्षरी-तीन हजार रु मात्र) मा.उच्च न्यायालय मा.कामगार न्यायालय, मा.औद्योगीक न्यायालय, मा.अप्पर विभागीय आयुक्त यांचे न्यायालय व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT) औरंगाबाद येथील प्रकरणासाठी कमाल फी ७०००/- (अक्षरी- सात हजार रु.मात्र) व कार्यालयीन खर्च म्हणुन २०००/- (अक्षरी-दोन हजार रु. मात्र ) तसेच जिल्हा न्यायालय, तालुका न्यायालय येथील प्रकरणासाठी कमाल फी ४०००/- (अक्षरी चार हजार रु. मात्र) व कार्यालयीन खर्च म्हणुन १५००- (अक्षरी- एक हजार पाचशे रु.मात्र) किंवा वेळोवेळी शासन ठरवुन देईल त्याप्रमाणे प्रकरण निहाय फी / मानधन अनुज्ञेय राहील. तथापी मासिक मानधन किंवा कोणताही भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.तसेच न्यायालयीन प्रकरणाचा अंतीम निर्णय लागेपर्यंत प्रकरण न्यायालयात चालविणे बंधनकारक राहील.

०६. न्यायालयीन प्रकरणाशिवाय या जिल्हा परिषदेला कार्यालयीन संचिकेवर/कायदेशीर बाबीवर अभिप्राय देण्यासाठी पॅनलवरील विधिज्ञास प्रती प्रकरण रुपये १०००/- (अक्षरी एक हजार रु.) इतके मानधन देण्यात येईल विधिज्ञांचा अभिप्राय घेण्याची आवश्यकता असल्यास व सामान्य प्रशासन विभागाने शिफारस केल्यास असे प्रकरण/संचिका सबंधित विधिज्ञांकडे पाठविण्यात येईल.

Scanned with CamScanner

०७. दर तीन महिन्यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचे अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात येईल विधिज्ञांचे कामकाज असमाधानकारक दिसुन येईल किंवा जिल्हा परिषदेच्या बाजुने निकाल /निर्णय लावणेसाठी सबंधिताचे प्रयत्न कमी पडताना दिसतील त्यांची विधिज्ञ पॅनलवरील नियुक्ती तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येईल.

०८. प्रत्येक कोर्टकेस मध्ये अंतरीम,अंतीम निर्णय झाल्यानंतर त्याची प्रमाणीत सत्यप्रत जिल्हा परिषदेला पाठवुन त्यावर जिल्हा परिषदेने कोणती कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्याबावत लेखी पत्राने कळविणे आवश्यक राहील.

०९. मा.जिल्हा/तालुका न्यायालयासाठी किमान ५ वर्ष मा.सर्वोच्च न्यायालय /मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद,मा.कामगार न्यायालय,मा.औद्योगीक न्यायालय, मा.अप्पर विभागीय आयुक्त यांचे न्यायालय व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण (MAT ) औरंगाबाद मा. उच्च न्यायालयातील किमान १०/५ वर्ष वकीली व्यवसायाचा अनुभव (दर्जेदार व गुणवत्तापुर्ण सेवेसाठी ) आवश्यक राहील सदरचा अनुभव नसल्याचे निदर्शनास आल्यास कोणत्याही क्षणी नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहतील.

१०. विधिज्ञांना Bar Council of Maharashtra And Goa Mumbai यांचेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल तसेच विधिज्ञांचा वकीली व्यवसायाचा अनुभव विचारात घेण्यासाठी सबंधित विधिज्ञ ज्या न्यायालयाच्या न्यायीक अधिकारी कक्षेत प्रत्यक्ष वकीली व्यवसाय करीत असतील त्या न्यायालयाच्या सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले अनुभव प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

११. पॅनलवर निवड झाल्यानंतर या जिल्हा परिषदेच्या किंवा जिल्हा परिषदेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयाच्या विरुध्द प्रकरण न घेणे बंधनकारक राहील.

१२. एकाच मुद्यावर किंवा विषयावर अनेक प्रकरणे एकाच न्यायालयात दाखल झालेली असल्यास सदर प्रकरणे एकाच विधिज्ञांकडे सोपविण्यात येतील व अशा प्रकरणास एकच प्रकरण समजुन एका प्रकरणासाठी नमुद केलेली विधिज्ञ फिस देण्यात येईल तसेच एकाच प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी किंवा इतर अधिकारी प्रतिवादी असतील ते एकच प्रकरणात एका प्रकरणासाठी अनुज्ञेयअसलेली फी अदा करण्यात येईल.

१३. मा.उच्च न्यायालयातील प्राप्त रिट याचिके बाबतचे परिच्छेद निहाय अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर इंग्रजीमध्ये भाषांतर करुन ३ दिवसात जिल्हा परिषदेला पाठविणे बंधनकारक राहील. तसेच इंग्रजी भाषांतरास जि.प.ची मान्यता घेतल्याशिवाय शपथपत्र दाखल करता येणार नाही.

१४. मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथील पॅनलसाठी स्टँडींग कॉन्सिल (Standing Council ) म्हणुन निवड झालेल्या विधिज्ञांना या जिल्हा परिषदेच्या हितार्थ स्वतःहुन तातडीच्या प्रकरणात परस्पर मा.न्यायालयात उपस्थित रहावे लागेल.परंतु त्यांना अशा प्रकरणात प्रती उपस्थितीसाठी रुपये ५००/- मानधन मिळेल मात्र ते प्रकरण स्वतःकडेच मिळण्यासाठी आग्रह धरता येणार नाही.

१५. सुनावणीचे वेळेस मा.न्यायालयात उपस्थित न राहणे,विहित शपथपत्र सादर न करणे, जि.प.चे परिच्छेद निहाय अभिप्राय जशाच तसे मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणुन न देणे, जिल्हा परिषदेच्या विरोधात निकाल जाणार नाही याची दक्षता न घेणे इ. बाबी निदर्शनास आल्यास तात्काळ जिल्हा परिषद पॅनलवरुन कमी करण्यात येईल.

१६. यापुर्वी या कार्यालाकडे सादर केलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत. सदरच्या जाहिराती अन्वये प्राप्त अर्जाचांच विचार केला जाईल.

१७. करारी सेवेबाबत करारनामा रु. १००/- च्या बॉन्डवर करावा लागेल.

Scanned with CamScanner

## अर्ज करण्याची पध्दत

अर्ज मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांचे नावे करावा.तसेच अर्जामध्ये कोणत्या न्यायालयात काम करण्यासाठी इच्छुक आहात याची स्पष्ट नोंद असावी. अर्जा सोबत सर्व शैक्षणिक कागदपत्रे, कायद्याची पदवी व असल्यास व कायद्याची पदवीत्तर पदवी (L.L.B/L.L.M) बार कौन्सिलकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र,सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले अनुभव प्रमाणपत्र, स्वयंम साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात,

वरील पैकी कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास व कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता व कारण न दर्शविता पॅनलवरुन कमी करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरणास राहतील.

(सुर्यकांत भुजवळ)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा पषिद, उस्मानाबाद

राहुल गुप्ता ( भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

Scanned with CamScanner

जिल्हा परिषद,उस्मानाबाद
सामान्य प्रशासन विभाग
Email-dyceo.osmanabad@gmail.com
Phone No - 02472 / 223388/ Fax No -223377

जा.क्र.जिपउ/साप्रवि/विधीकक्ष /कावि/300/२०२३ दिनांक :- 31/ ०७/२०२३

## जाहीर प्रगटन

जिल्हा परिषद,उस्मानाबाद अंतर्गत मा.सर्वाच्च न्यायालय दिल्ली, मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद/मा.औद्योगिक व कामगार न्यायालय लातुर,मा प्रशासकीय न्यायाधीकरण,औरंगाबाद (MAT) मा.जिल्हा न्यायालय ,उस्मानाबाद व उस्मानाबाद जिल्हयातील सर्व तालुका न्यायालय येथे जिल्हा परिषद,उस्मानाबादच्या वतीने बाजु मांडण्यासाठी विधिज्ञ नियुक्त करणे आहे. सदरील नियुक्तीचा विधिज्ञ पॅनल कालावधी दि.०१/०९/२०२३ ते ३१/०७/२०२४ असा असणार आहे. त्यासाठी या कार्यालाकडुन दिनांक 31०७/२०२३ रोजी पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरील अर्ज कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचे कार्यालयात सादर करावेत. सदरील पदा बाबतची शैक्षणिक अर्हता,सविस्तर माहिती व अटी शर्ती https://www.zposmanabad.gov.in या वेबसाईटवरउपलब्ध आहे.

**आवश्यक पदाची संख्या.**

| अ.क्र. | मा.न्यायालयाचे नाव | पद संख्या |
|---|---|---|
| १ | मा.सर्वाच्च न्यायालय ,दिल्ली | १ |
| २ | मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद ,मा.प्रशासकीय न्यायाधीकरण, औरंगाबाद (MAT) | - |
| ३ | मा.कामगार न्यायालय लातुर | - |
| ४ | मा.जिल्हा व सत्र न्यायालय उस्मानाबाद व सर्व तालुका न्यायालय | - |

राहुल गुप्ता (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद उस्मानाबाद

Scanned with CamScanner

# नमुना अर्ज

फोटो

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद उस्मानाबाद

विषय :- जिल्हा परिषद उस्मानाबादच्या विधिज्ञ पॅनलवर नियुक्त करणे बाबत

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ज्या न्यायालयाच्या पॅनलसाठी अर्ज करावयाचा आहे त्या न्यायालयाचे नाव | | | | | |
| २ | अर्जदाराचे पुर्ण नांव | | | | | |
| ३ | पुर्ण पत्ता | | | | | |
| ४ | संपर्क क्रमांक (मोबाईल क्र.) | कार्यालय | | | निवास | |
| | | | | | | |
| ५ | ईमेल | | | | | |
| ६ | जन्म दिनांक. | | | | | |
| ७ | ज्ञात भाषा | | | | | |
| ८ | वकीली व्यवसायाचा अनुभव | | | | | |
| ९ | शैक्षणीक पात्रता | अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | विद्यापिठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
| | | | | | | |
| १० | शासनाच्या निमशासकीय संस्थाच्या पॅनलवर आहे काय असल्यास | संस्थेचे नाव | | | कधीपासुन कालावधी | |
| | | | | | | |
| ११ | कोणत्या विशिष्ट कायद्यांच्या संदर्भात प्राविण्य आहे. | | | | | |
| १२ | वैशिष्टयपुर्ण कामाचा तपशील | | | | | |

**अर्जासोबत जोडण्यात आलेले कागदपत्रे:-**

१. शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे (LLB/LLM पदवी प्रमाणपत्र/गुणपत्रक)

२. बार कौन्सीलकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र

३. अनुभव प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले)

४. इतर

**स्वाक्षरी**





Scanned with CamScanner